**भूमि संपादन ,पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम , २०१३ चे कलम ११ (१) नुसार अधिसूचना.**

जा.क्र२०१५/एलएनक्यू/एसआर
उपजिल्हाधिकारी भूसंपादन अधिकारी कार्यालय
जा.प्र.क्र.४ बीड मु. अंबाजोगाई
दि. २४/०८/२०१५

ज्या अर्थी महाराष्ट्र शासन महसूल व वनविभागाची अधिसूचना क्र. Mis/11/2014/CR/77/A2 दिनांक 19 जानेवारी 2015 (यास यापुढे सदर अधिसूचना असे संबोधले जाईल) भूमि संपादन ,पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम , 2013 चे कलम ३ पोटकलम ई अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन असे अधिसूचित केले आहे की सदर अधिनियमाच्या कलम 3 (झअ) अन्वये सार्वजनिक जमिनीच्या संपादनाबबत 5०० हेक्टर पेक्षा कमी क्षेत्र असल्यास सदर जिल्हयाचा जिल्हाधिकारी या कादद्यान्वये अंमलात आणावयाच्या कार्यवाहीसाठी समुचित शासन असल्याचे मानले जाईल.

त्याअर्थी सदर अधिसूचने अन्वये जिल्हाधिकारी बीड हे समुचित शासन आहे त्याअर्थी परिशिष्ट I मध्ये नमुद जमिन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते तसेच सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट II मध्ये करण्यात आले आहे. त्याअर्थी सदर कायदयाच्या कलम 11 उपकलम (A) अन्वये अधिसूचित करण्यात येते की, सार्वजनिक प्रयोजनासाठी सदर जमिन संपादनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते.

त्याअर्थी, परिशिष्ट III मध्ये भूसंपादनामध्ये विस्थापित कुटूंबासाठी प्रस्तावित जमिन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्याअर्थी, परिशिष्ट IV मध्ये सामाजिक आघात निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्याअर्थी, परिशिष्ट V मध्ये सदर कायदयाचे कलम 43 उपकलम (1) अन्वये पुनर्वसन विषयक कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशिल देण्यात आला आहे.

त्याअर्थी, सदर कायदयाच्या कलम 11 उपकलम (4) अन्वये असे जाहीर करण्यात येते की सदरची अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून सदर कायदयाचे प्रकरण IV मधील कार्यवाही पूर्ण होईल अशा वेळेपर्यत कोणतेही व्यक्ती प्राथमिक अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीचा कोणताही व्यवहार / हस्तांतरण करणार नाही किंवा कोणताही व्यवहार / हस्तांतरण करविणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु, जिल्हाधिकारी अशाप्रकारे अधिसूचित केलेल्या जमिनीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोटकलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमिनी जमिन मालकास सूट देऊ शकेल परंतु आणखी असे की कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे जाणीवपूर्वक उल्लघंन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकारीद्वारे भरपाई करण्यात येणार नाही.

सदर कायदयाच्या कलम 11 चे उपकलम (5) व भूमि संपादन पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम 2014 चे कलम उपनियम 3 अन्वये जिल्हाधिकारी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे भूमि अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल.

आणि ज्याअर्थी, सदर कायदयाचे कलम 3 उपकलम (ग) अन्वये जिल्हाधिकारी, बीड हे समुचित शासन असल्याने उपजिल्हाधिकारी भूसंपादन अधिकारी कार्यालय जा.प्र.क्र.४ बीड मुख्यालय अंबाजोगाई यांना जिल्हाधिकारी यांचे वतीने काम पार पाडण्यासाठी प्राधिकृत करीत आहे.

## परिशिष्ट I
## जमिनीचे वर्णन

गावाचे नाव-तळेगावघाट तालुका- अंबाजोगाई जिल्हा - बीड

| अ.क्र. | स.नं./ग.नं | अंदाजित क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| | 65 | 0.75 |
| | 78 | 0.57 |
| | 104 | 1.09 |
| | 126 | 1.84 |
| | 66 | 1.25 |
| | 72 | 0.66 |
| | 76 | 0.48 |
| | 77 | 0.01 |
| | 79 | 0.03 |
| | 80 | 0.64 |
| | 82 | 0.30 |
| | 83 | 0.36 |
| | 84 | 0.31 |
| | 85 | 0.38 |
| | 86 | 0.22 |
| | 98 | 1.50 |
| | 99 | 0.77 |
| | 100 | 2.08 |
| | 101 | 1.17 |
| | 105 | 3.64 |
| | 107 | 0.33 |
| | 108 | 1.04 |
| | 109 | 0.01 |
| | 111 | 0.68 |
| | 112 | 1.04 |
| | 118 | 0.45 |
| | 119 | 1.62 |
| | 122 | 1.94 |
| | 123 | 0.07 |
| | 125 | 0.78 |
| | 167 | 1.06 |
| | 168 | 0.79 |
| | 169 | 0.54 |
| | 172 | 0.40 |
| | 183 | 0.13 |
| | 124 | 0.75 |
| | 103 | 0.60 |
| | 113 | 0.25 |
| | 120 | 0.11 |
| | 121 | 0.84 |

## परिशिष्ट II
## संपादनाचे उद्दिष्ट

प्रकल्पाचे नाव - रेणापूर मध्यम प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्र मौ. तळेगावघाट ता. अंबाजोगाई जि.बीड
प्रकल्पाचे विवरण - रेणापूर मध्यम प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्र मौ. तळेगावघाट ता. अंबाजोगाई जि.बीड
सामाजिक फायदे - सिंचन

## परिशिष्ट III
## पुर्नवसन विषयक बाबीचे विवरण

गावाचे नाव - मौ. तळेगावघाट तालुका - अंबाजोगाई जिल्हा - बीड

| अ.क्र. | स.नं. / ग.नं. | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| | लागू नाही | |

## परिशिष्ट IV
## सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा गोषवारा

लागू नाही

## परिशिष्ट V
## प्रशासक नियुक्तीचे विवरण

१) प्रशासकाचे पदनाम - लागू नाही
२) प्रशासकाचा कार्यालयीन पत्ता - लागू नाही
३) ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती केली ते नमूद करावे - लागू नाही

सदर अधिसूचिनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायदयाचे कलम 11 चे उपकलम (1) खाली अधिसूचित करण्यात आले आहे असे कोणत्याही जमिनीमध्ये हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीला प्रारंभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत उपजिल्हाधिकारी भूसंपादन जा.प्र.क्र. ४ बीड मुख्यालय अंबाजोगाई यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल .

**नोट** - प्रस्तुत जमिनीचा नकाशा पाहण्यासाठी उपजिल्हाधिकारी भूसंपादन जा.प्र.क्र. ४ बीड मुख्यालय अंबाजोगाई यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.

**दिनांक - २४/०८/२०१५**
**ठिकाण - अंबाजोगाई**

**प्रशांत सुर्यवंशी**
**उपजिल्हाधिकारी भूसंपादन**
**जा.प्र.क्र. ४ बीड मुख्यालय अंबाजोगाई**

Attested

**विशेष भूसंपादन अधिकारी**
**जा.प्र.क्र.४ बीड - मु. अंबाजोगाई**